# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 17.11.2025** **वार- सोमवार**

---

**<u>अर्जमुदत</u>**

राज्यात नगरपरिषदा आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी अर्ज करण्याचा आज शेवटचा दिवस होता. उद्या, मंगळवारी या अर्जांची छाननी होणार आहे. त्यानंतर वैध उमेदवारांची यादी जाहीर केल्यानंतर 19 ते 21 नोव्हेंबर या दरम्यान ज्या प्रभाग किंवा अर्जावर अपिल आहे असे सोडून इतर ठिकाणी अर्ज मागे घेता येतील. 26 नोव्हेंबर रोजी उमेदवारांची चिन्हांसह अंतिम यादी जाहीर करण्यात येईल.

**<u>बिबट्या</u>**

जुन्नर विभागात बिबट्यांच्या हालचालींवर नियंत्रण मिळवण्यासाठी मोठी मोहीम राबवली जाणार असल्याचं वनमंत्री गणेश नाईक यांनी आज पुण्यात पत्रकारांशी बोलताना सांगितलं. सध्या बिबट्या पकडण्यासाठी असलेले दोनशे पिंजरे आता वाढवून एक हजार करण्यात येणार आहेत. याशिवाय, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्यानं काही ठिकाणी कॅमेरे बसवले जाणार आहेत. बिबट्या आसपास आल्यास भोंगा वाजवून नागरिकांना सतर्क करण्यात येईल. या संपूर्ण यंत्रणेवर 11 कोटी रुपयांचा खर्च होणार असून ती विशेषतः पुणे जिल्ह्याकरता उभारली जाणार आहे, असं नाईक म्हणाले. बिबट्यांचे हल्ले आणि त्यातून होणारी जीवितहानी टाळण्यासाठी प्रशासन सर्वतोपरी खबरदारी घेणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. पुढच्या दहा बारा दिवसांत काही बिबटे वनतारामध्ये तर काही आफ्रिकेच्या जंगलात पाठवले जातील. तसंच जुन्नर विभागात बिबट्यांना नसबंदी करण्यासाठी देखील परवानगी मिळाली आहे, असं नाईक यांनी सांगितलं.

**<u>नवले पुल</u>**

पुणे शहरातील वाहतूक सुधारण्याच्या दृष्टीनं आज पुण्यात विधानभवनात एक आढावा बैठक घेण्यात आली. वाहतूक नियमांचं उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी यावेळी दिले. नवले पुलावर झालेल्या गंभीर अपघाताची संबंधित यंत्रणांनी तात्काळ चौकशी करावी आणि या मार्गावर आवश्यक त्या उपाययोजना तात्काळ कराव्यात, अशाही सूचना त्यांनी दिल्या. पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, पीएमआरडीए आयुक्त डॉ. योगेश म्हसे, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

**<u>समाधी सोहळा-देखणे</u>**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचा 729वा संजीवन समाधी सोहळा आज आळंदी इथं भाविकांच्या अलोट गर्दीमध्ये, भावपूर्ण वातावरणात पार पडला. पहाटे अडीच वाजता मंदिर समितीचे विश्वस्त निरंजननाथ महाराज यांच्या हस्ते ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधीवर पौमान अभिषेकानं समाधी सोहळ्याच्या कार्यक्रमांना सुरुवात झाली. नामदेव महाराजांच्या वंशजांच्या कीर्तनानंतर दुपारी 12 वाजता समाधीवर पुष्पवृष्टी होऊन हा सोहळा पार पडला.

**<u>अरुणावढेरे</u>**

'संत ज्ञानेश्वर महाराज हे खऱ्या अर्थानं पारमार्थिक लोकशाहीचे जनक आहेत,' असं प्रतिपादन ज्येष्ठ लेखिका आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संत ज्ञानदेव अध्यासनाच्या प्रमुख डॉ. अरुणा ढेरे यांनी आज काढले. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी दिनानिमित्त विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. ज्ञानेश्वर महाराजांनी संस्कृत

साहित्य सर्वसामान्यांच्या भाषेत आणून समाजजोडणीचं महान कार्य केलं. अमृतानुभव, चांगदेव पासष्टी यांसारख्या ग्रंथांद्वारे त्यांनी मराठी भाषेला आध्यात्मिक आणि सामाजिक उंची दिली, असं ढेरे म्हणाल्या.

**कुष्ठरोग अभियान**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कुष्ठरोग शोध अभियानांतर्गत राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये आजपासून कुष्ठरोग रुग्णशोध अभियानाची सुरुवात झाली आहे. या अभियानात 1 कोटी पेक्षा जास्त घरे सर्वेक्षणासाठी निवडली असून त्यातील 8 कोटी 66 लाख लोकसंख्येची तपासणी करण्याचं उद्दिष्टय आहे. ही मोहीम 2 डिसेंबरपर्यंत चालणार आहे. सर्व सरकारी आरोग्य यंत्रणेमार्फत कुष्ठरोगावरील उपचार पूर्णपणे मोफत उपलब्ध असल्याचं आरोग्य विभागानं म्हटलं आहे.

**आरोग्य**

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळतर्फे जय गणेश पालकत्व योजनेतील 378 विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी शनिवार पेठेत करण्यात आली. या शिबीरात 298 विद्यार्थ्यांची नेत्रतपासणी आणि 231 विद्यार्थ्यांची दंततपासणी करण्यात आली.

**पिंपरी चिंचवड**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर संकलन विभागानं मालमत्ता कर थकवणाऱ्या थकबाकीदारांवर जप्तीची कारवाई सुरु केली आहे. 1 ते 15 नोव्हेंबर या कालावधीत शहरातील 35 मालमत्तांवर जप्तीची कारवाई करण्यात आली असून 105 नळ जोडण्या खंडित करण्यात आल्या आहेत.

**वटवृक्षपार्क**

खडकवासला धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील सरकारी पडीक जमिनीवर देशातलं पहिलं वटवृक्ष उद्यान उभारण्यात आलं आहे. लोकसहभाग आणि ग्रीन थंब संस्थेच्या पुढाकारातून केवळ आठ नऊ महिन्यात तयार करण्यात आलेल्या या उद्यानात 70 वटवृक्ष बहरत आहेत. याशिवाय या परिसरात बांबू उद्यान, विविध आयुर्वेद औषधी वृक्ष, देवराई, पशुपक्षी निवारा केंद्र देखील उभारण्यात आलं आहे.

**अपघात**

पुण्यातील हडपसर इथल्या गोपालपट्टी भागात काल रात्री पुणे दौंड डेमू गाडीची धडक लागून तीन जणांचा मृत्यू झाला. पाच तरुण रेल्वे रुळावर गप्पा मारत असताना हा अपघात झाल्याचं पोलिसांनी सांगितलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात थंडीचा कडाका वाढला असून आज किमान तापमान 10 पूर्णांक 2 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही किमान तापमान साधारण असंच असेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**